**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक २१ मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेचे निकाल जाहीर, ९७ पूर्णांक ५१ टक्के सहित कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक; नागपूर विभागाचा निकाल ९३ पूर्णांक १२ टक्के.**
2. **नागपूर आणि रामटेक लोकसभा मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सत्र संपन्न.**
3. **काल पार पडलेल्या लोकसभा निडवणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या मतदानासोबत राज्यातील मतदानाची प्रक्रिया पूर्ण.**

4. **मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे प्रवाश्यांच्या सुविधेसाठी SCADA प्रणालीची यशस्वी अंमलबजावणी.**

*****

बारावी निकाल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीचा निकाल आज मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनीजाहीर केला. या परीक्षेसाठी यंदा ९३ पूर्णांक ३७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यापरीक्षेत मुलींच्या उत्तीर्ण होण्याचं प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी ९५ पूर्णांक ४४ इतकी आहे, तर ९१ पूर्णांक ६० टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत. यंदा कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९७ पूर्णांक ५१ टक्के इतका लागला असून, सर्वात कमी निकाल मुंबई विभागाचा ९१ पूर्णांक ९५ टक्के इतका आहे. याशिवाय शिवाय नागपूर विभागाचा निकाल ९३ पूर्णांक १२, तर अमरावती ९३ टक्के निकाल लागला आहे. नागपूर विभागात एकूण प्रविष्ट विदयार्थी १ लाख ५५ हजार ३७४ इतके होते तर उत्तीर्ण विद्यार्थी १ लाख ४३ हजार १३१ आहेत. यात मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.८५ % आहे तर मुलींचे प्रमाण ९४. ४६% आहे.

हा निकाल मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. गुण पडताळणीसाठी आणि उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी पाच जून पर्यंत सशुल्क ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. शाखानिहाय निकालात यंदा विज्ञान शाखेच्या

विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचं प्रमाण सर्वाधिक असून यात ९७ पूर्णांक ८२ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्णझाले आहेत. याशिवाय यंदा प्रथमच प्रॅक्टिकल आणि इंटर्नल मार्क्स पोर्टल वर अपडेट करण्यात आले. याशिवाय १५४ विषयांपैकी २६ विषयांचा निकाल १००% आहे हे विशेष तर खाजगी विद्यार्थी म्हणून नोंदी केलेल्यांचा निकाल ८५% आहे.

राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी

देशभरात आज दहशतवाद विरोधी दिवस पाळण्यात येत आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्तहा दिवस पाळला जातो. २१ मे १९९१ रोजी एलटीटीई या दहशतवादी संघटनेनं तामिळनाडु मधल्या श्रीपेरम्बुदूर इथं केलेल्या बॉम्बस्फोटात राजीव गांधी यांचं निधन झालं होतं. राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुंबई इथं मंत्रालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना दहशतवाद आणि हिंसाचारविरोधी दिनाची शपथ देण्यात आली. नागपूर म.न.पा.च्या केन्द्रीय कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त राजीवजींच्या तैलचित्राला आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. नागपूर आकाशवाणी कार्यालयात देखील दहशतवाद आणि हिंसाचारविरोधी दिनाची शपथ कर्मचाऱ्यांनी घेतली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राजीव गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. राजीव गांधी यांच्या स्मृती दिनानिमित्त नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमेटीच्या वतीने नागपूर शहर काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष विकास ठाकरे, शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा ऍड.नंदा पराते यांनी नागपुरातील देवडिया काँग्रेस भवन इथं त्यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल. यावेळी काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी झालेल्या सभेत राजीव गांधी यांच्या स्मृतीला उजाळा देण्यात आला.

मतमोजणी

मतमोजणीतील कर्तव्य पार पाडताना सर्वांना विश्वासात घेऊन अधिक जबाबदारीने मतमोजणी व्हावी यावर प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी भर दिला पाहिजे. मतमोजणीसाठी उपस्थित असलेल्या विविध उमेदवार प्रतिनिधींच्या मनात जर काही शंका असतील तर त्याचे तात्काळ निरसन झाले पाहिजे. सकाळी 6 पासून

मतमोजणी पूर्ण होईपर्यंत आपल्याला संयमाने काम करायचे आहे ही मानसिकता ठेवा असे आवाहन नागपूरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी केले. रामटेक आणि नागपूर लोकसभा निवडणुकीची मतमोजणी येत्या 4 जूनला कळमना मार्केट इथं होणार असून, त्या दृष्टीने मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण सत्रात ते बोलत होते. 4 जूनला सर्वसाधारण मोजणी व पोस्टल बेलॅटची मतमोजणी होणार आहे. पोस्टल मतपत्रिकेची मतमोजणी सर्वात अगोदर होणार आहे. 500 बॅलेट पेपरसाठी एक टेबल असेल. यावर सहाय्यक निवडणूक अधिकारी-कर्मचारी नियुक्त केले आहेत. पोस्टल मतपत्रिकेसाठी 10 टेबल 10 अधिकारी राहणार आहेत. यापूर्वी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ईव्हीएम हातळण्याबाबतचे पहिले प्रशिक्षण देशपांडे सभागृहात पार पाडले आहे. काल झालेल्या प्रशिक्षणात पोस्टल मतपत्रिका कशी उघडावी, मत कसे गणण्यात यावे याबाबत माहिती देण्यात आली.

विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार

साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च समजला जाणारा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार 97 व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे यांना देऊन महाराष्ट्र शासनाने गौरवान्वित केले. त्यानिमित्त रविवार, 26 मे रोजी त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, ‘सक्षम समीक्षा’ या त्रैमासिकाने काढलेल्या डॉ.रवींद्र शोभणे साहित्य विशेषांकाचे प्रकाशन देखील यावेळी करण्यात येणार आहे. झांशी राणी चौकातील विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात रविवारी सायंकाळी 6 वाजता हा कार्यक्रम होणार आहे. अध्यक्षस्थानी वि.सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते राहणार असून सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. गिरीश गांधी यांच्या हस्ते सत्कार व विशेषांकाचे प्रकाशन होणार आहे.

जैवविविधता दिवस

उद्या 22 मे आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिवस 2024 निमित्त महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाने नागपूरच्या हिस्लॉप कॉलेज जवळील चिटणवीस सेंटर येथे उद्या सकाळी साडेदहा ते सायंकाळी पाच पर्यंत राज्यस्तरावरील कार्यक्रम आणि जैवविविधतेचे संवर्धन या संकल्पनेवर आधारित एका कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

पाचवा टप्पा

लोकसभा निडवणुकीच्या पाचव्या टप्प्यात काल राज्यातल्या १३ मतदार संघांमध्ये मतदान झालं. एकंदर ५४ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदान झाल्याचं निवडणूक कार्यालयानं कळवलं आहे. यापैकी सर्वाधिक ६२ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदान दिंडोरी मतदारसंघात, त्याखालोखाल ६१ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान पालघर जिल्ह्यात झालं. तर दक्षिण मुंबई मतदारसंघात सर्वात कमी, ४७ पूर्णांक ७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. धुळ्यात ५६ पूर्णांक ६१ शतांश टक्के, नाशिकमध्ये ५७ पूर्णांक १० शतांश टक्के, भिवंडीत ५६ पूर्णांक ४१ शतांश टक्के, कल्याणमध्ये ४७ पूर्णांक ८ शतांश टक्के, तर ठाणे मतदारसंघात ४९ पूर्णांक ८१ शतांश टक्के मतदान झालं. उत्तर मुंबईत ५५ पूर्णांक २१ शतांश टक्के, उत्तर मध्य मुंबईमध्ये ५१ पूर्णांक ४२ शतांश टक्के, उत्तर पूर्व मुंबई मतदारसंघात ५३ पूर्णांक ७५ शतांश टक्के, उत्तर पश्चिम मुंबईत ५३ पूर्णांक ६७ शतांश टक्के तरदक्षिण मध्य मुंबईत ५१ पूर्णांक ८८ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. याबरोबरच लोकसभा निवडणुकीची राज्यातली प्रक्रिया पूर्णझाली. आत्तापर्यंतच्या पाच टप्प्यांमध्ये देशभरातल्या एकंदर ४२८ लोकसभा मतदार संघांमध्ये मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

SCADA प्रणाली

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागानं त्यांच्या  त्याच्या इलेक्ट्रिक ट्रॅक्शन नेटवर्कसाठी सुपरवायझरी कंट्रोल अँड डेटा एक्विझिशन प्रणालीची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. हे अत्याधुनिक तंत्रज्ञान या प्रदेशातील रेल्वे ऑपरेशनची विश्वासार्हता, सुरक्षितता आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या SCADA प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे प्रवासी आणि रेल्वे ऑपरेशन दोन्हीसाठी अनेक फायदे होणार आहेत. ही प्रणाली रिअल-टाइम मॉनिटरिंग आणि नियंत्रण क्षमतेत व्यत्यय टाळण्यासाठी आणि वीज पुरवठा सुनिश्चित करण्यात मदत करते. याशिवाय संभाव्य समस्या ओळखण्यासाठी आणि त्या समस्या तीव्र होण्यापूर्वी सुधारात्मक कारवाई करण्यासाठी सिस्टम ऑपरेटरना महत्त्वपूर्ण माहिती प्रदान करते. ही प्रणाली डेटा विश्लेषण आणि डेटा- संचालित निर्णय घेण्यास ऑपरेटर्स ला सक्षम करते.SCADA सिस्टीम नागपूर डिव्हिजनला अनेक महत्वाच्या कार्यक्षमता प्रदान करत असल्याने या विभागाचे कार्य सुकर होणे अपेक्षित आहे.

हवामान

राज्यात येत्या दोन दिवसांत तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पश्चिम

विदर्भातल्या जिल्ह्यांमध्ये जसे अकोला, अमरावती, वाशीम, यावतमाळ इथं सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडणार असल्याचं, हवामान विभागाने सांगितलं आहे. नागपूरसह पूर्व विदर्भातील हवामान सामान्य राहणार आहे. दरम्यान विदर्भात गेल्या २४ तासात सर्वाधिक तापमान अकोला इथं ४३ पूर्णांक आठ इतकं नोंदविण्यात आलं. तर अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर इथं तापमान ४२ अंशाच्या घरात होतं. नागपुरात ३९ पूर्णांक ४ अंश सेल्सियस इतका तापमान नोंदविण्यात आलं. दरम्यान आगामी काही तासात विदर्भातील नागपूर, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ गडचिरोली, चंद्रपूर आणि वाशीम इथं वादळी पर्जन्यमानाचा इशारा देण्यात आला आहे.

******